श्रीम.तरन्नुम बशेरखान खान,प्रा.शि.
जि.प.प्रा.शा. शिर्डी (उर्दु),ता.राहाता
यांचे पदस्थापना आदेशात अंशतः
बदल करणेबाबत

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथ.)
जावक क्रमांक वशि/खाचौ/१३९९ /2018
अहमदनगर, दिनांक -१८/१२ /2018

संदर्भ - 1) या कार्यालयाकडील आदेश क्रमांक शिक्षण/का-1/पीई-6/1048/2016
दिनांक - 30/05/2016
2) गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती राहाता यांचेकडील पत्र क्रमांक
अस्था1/191/2018, दिनांक 01/06/2018
3) या कार्यालयाकडील दोषारोप ज्ञापन क्रमांक वशि/खाचौ/970/2018, दिनांक 14/08/2018
4) या कार्यालयाकडील विभागीय चौकशी अधिकारी नियुक्ती आदेश क्रमांक
कार्या2/खातेचौकशी/1144/2018, दिनांक 15/10/2018
5) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964
6) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील परिपत्रक
क्र. डिईएन/2689/सीआर/765/20, दिनांक 04/06/1990

श्रीम. तरन्नुम बशेरखान खान, प्राथमिक शिक्षिका (उर्दु) या सन 2015-2016 च्या संच मान्यतेनुसार आश्वी बु. ता.संगमनेर येथे प्राथमिक शिक्षिका (उर्दु) या पदावर अतिरिक्त ठरल्यामुळे या कार्यालयाकडील आदेश क्रमांक शिक्षण/का-1/पीई-6/1048/2016, दिनांक 30/05/2016 अन्वये त्यांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिर्डी उर्दु, ता.राहाता येथे पदस्थापना देणेत आलेली होती. त्यानुसार श्रीम.खान यानां दिनांक 31/05/2016 रोजी कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त करण्यांत आलेले होते. श्रीमती तरन्नुम बशेरखान खान या दिनांक 01/06/2016 पासून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिर्डी उर्दु येथून अनाधिकृत गैरहजर आहेत. गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती राहाता यांचेकडील अहवालानुसार सद्यस्थितित जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिर्डी उर्दु, पंचायत समिती राहाता अंतर्गत प्राथमिक शिक्षक उर्दु या संवर्गातची सर्व पदे भरणेत आलेली आहेत.

सबब न्याय हक्काचे दृष्टीने संदर्भ क्रमांक 5 मधील तरतुदी विचारात घेऊन मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर संदर्भ क्रमांक 6 अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन. श्रीमती तरन्नुम बशेरखान खान, प्राथमिक शिक्षिका, यांना संदर्भ क्रमांक 1 नुसार बजाविणेत आलेले पदस्थापना आदेश रद्द करुन त्यांना जिल्हा परिषद सेवेत सामावुन घेऊन, त्यांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अकोले उर्दु,पंचायत समिती **अकोले** (शिक्षण विभाग), जिल्हा - अहमदनगर येथे प्राथमिक शिक्षिका (उर्दु) या पदावर नियमित पदस्थापना देऊन नेमणुक करणेत येत आहे.

सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करण्यांत यावी. श्रीमती तरन्नुम बशेरखान खान, प्राथमिक शिक्षिका (उर्दु) यांनी दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे. तसेच सदर आदेशाची नोंद संबंधितांच्या मुळ सेवा पुस्तकांत घेणेत यावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संकेतांक २०१८१२१९१६०४१६ असा आहे.

(विश्वजीत माने)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्रीमती खान तरन्नुम बशेरखान, प्राथमिक शिक्षिका, पंचायत समिती अकोले जिल्हा अहमदनगर
द्वारा व प्रत - गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती अकोले
2/- सदर आदेश श्रीमती तरन्नुम बशेरखान खान, प्राथमिक शिक्षिका उर्दु, पंचायत समिती राहाता जिल्हा अहमदनगर यांना समक्ष बजाविणेत येऊन त्यांची पोहोच या कार्यालयांस तात्काळ

(विश्वजीत माने)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर